# रामायण म्हणजे प्रत्येक घरातील कथा
## - रामायणाचार्य ह.भ.प.रामरावजी ढोक महाराज

पनवेल(प्रतिनिधी) रामायण म्हणजे काही ऐतिहासिक घटना नाही, ही प्रत्येक घरातील, प्रत्येक कुटूंबातील कथा आहे. जीवनातील सर्व समस्यांचे समाधान रामायणात आहे. मानसरोवरापेक्षाही फार मोठे आणि फार महान असे रामचरित्र आहे. त्यामुळे रामचरित मानस हे यथार्त नाव आहे असे आपल्या प्रवचानात रामायणाचार्य ह.भ.प. रामरावजी ढोक महाराज (नागपूरकर) यांनी खारघर येथे रामायणाचा मतीतार्थ सांगताना कथन केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, श्री संत तुकोबाराय चॅरिटेबल ट्रस्ट खारघर, श्री साई ज्ञानेश्वर माऊली चॅरिटेबल ट्रस्ट, वामनबुवा दिंडी सोहळा तळोजा मजकूर आणि उरण व पनवेल तालुका वारकरी सांप्रदाय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर येथे सोमवारपासून (दि.०२ जून) “भव्य श्रीराम कथा” सोहळयाला प्रारंभ झाला. त्याप्रसंगी ढोक महाराज प्रवचन करताना बोलत होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना शुभेच्छा देताना रामायणाचार्य ह.भ.प. रामरावजी ढोक महाराज पुढे म्हणाले की, ज्या व्यक्तीवर आपली निष्ठा असते, तीच्या जीवनात काही अनिष्ठ घडू नये, यासाठी आपल्या इष्ट परमेश्वराकडे केलेली प्रार्थना म्हणजेच अभिष्टचिंतन असते, रामशेठ ठाकूर यांच्यावर येथील जनतेचे अमाप प्रेम आहे हे त्यांच्या असंख्य चाहत्यांमुळे दिसून येते, असे सांगून वाढदिवसानिमित्त ढोक महाराज यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिष्टचिंतन करून आशिर्वाद दिले.खारघरमधील सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या भव्य मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या सोहळयात रामायणाचार्य ह.भ.प. रामरावजी ढोक महाराज (नागपूरकर) यांनी पहिल्या दिवशी ग्रंथ महात्म्य (शिव पार्वती विवाह) शिव पार्वती मिलन कथा सांगितली. कथा सोहळयापूर्वी खारघर येथील कॉंग्रेसच्या मुख्य कार्यालयापासून रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल मैदानापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी टाळ-मृदुंगाच्या गजरात महिलांनी मंगल कलश डोक्यावर घेवून या मिरवणूकीत सहभाग घेतला. फटाक्यांची आतषबाजी, फुगडया, फेर आणि हरिनामाच्या गजराने अवघा खारघर परिसर दुमदुमला होता. सोहळयात लोकनेते रामशेठ ठाकूर, आयोजन समितीचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, कार्याध्यक्ष ह.भ.प.जी.आर.पाटील, ह.भ.प.वासुदेव महाराज म्हात्रे, ह.भ.प.विष्णुदादा मंगलुरकर, ह.भ.प.रामदास महाराज, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष भिमसेन माळी, कॉंग्रेसच्या विचार विभागाचे कांतीलाल कडू, नगरसेवक गणेश पाटील, उपाध्यक्ष अनंत तोडेकर, प्रभाकर जोशी, सचिव ह.भ.प.खंडूजी महाराज शिरोळे, मार्गदर्शक ह.भ.प.शिवाजी महाराज काळे, ह.भ.प.लहु महाराज, ह.भ.प.बाळाराम पदू पाटील, ह.भ.प.चाहूशेठ पोपेटा, ह.भ.प.रामचंद्र पाटील, ह.भ.प.नारायण पाटील, सुनिल सावर्डेकर, नरेश तोडेकर, ॲड.जे.पी.खारगे, बाळासाहेब कारंडे, रामदास नारकर, मनोहर कडू, दिनेश शिरसाट, खारघर महिला शहर अध्यक्षा कुंदा मेगडे, निलम खैरनार, रूपाली जैन, दीक्षा जगताप, ज्योती रायबोले, यांच्यासह हजारो वारकरी सांप्रदायिक उपस्थित होते.

“भव्य श्रीराम कथा” अंतर्गत ०३ जूनला श्रीराम जन्म, ०४ जून रोजी सिता स्वयंवर, ०५ जूनला राम वनवास व केवट कथा, ०६ जूनला भरत भेट-सिता हरण, ०७ जूनला वाली वध-लंकादहण तर रविवार ०८ जून रोजी रावण वध व रामराज्यभिषेक असे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर बाळ गोपाळ हरिपाठ मंडळ वावंजे, बाळ गोपाळ हरिपाठ मंडळ खारघर, श्री संत तुकाराम चॅरिटेबल ट्रस्ट खारघर, श्री संत ज्ञानोबा चॅरिटेबल ट्रस्ट सीबीडी, श्री सदगुरू वामनबाबा हरिपाठ मंडळ सिध्दी करवले, श्री सदगुरू वामनबाबा हरिपाठ मंडळ तळोजे मजकूर, श्री राम मंदिर खारघर महिला हरिपाठ मंडळ, केदारनाथ हरिपाठ मंडळ ओवे गाव कॅम्प, सार्वजनिक हरिपाठ व शिवमंदिर महिला हरिपाठ मंडळ खारघर यांचे दिननिहाय सायंकाळी ६ ते सायंकाळी ०७ वाजेपर्यंत हरिपाठाचे कार्य कमही होणार असून ०८ जूनला रात्री ०८ वाजता महाप्रसाद कार्यकम होणार आहे.